मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे कार्यालय, एस्प्लनेड, मुंबई

दिनांक :— ०७/०२/२०२६

निविदा सुचना

मुख्य न्यायदंडाधिकारी, मुंबई या कार्यालयाच्या त्रैवार्षिक मागणीपत्रानुसार देय असणारी लेखनसामग्री शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, नागपूर येथुन मुख्य न्यायदंडाधिकारी, मुंबई येथे चढ—उतारासहीत खाजगी वाहनाव्दारे आणण्याकरिता निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा मध्ये चढ—उताराचा खर्च नमुद करण्यात यावा. त्यासाठी संबंधित दरकरारदारांनांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे संबंधित दरकरारदारांनी आपल्या निविदा बंद लिफाफॅमध्ये घालून त्यावर **"लेखनसामग्री आणण्याकरिता निविदा"** असे स्पष्ट लिहावे.

तसेच इच्छुक दरकरारदारांना असे सूचित करण्यात येते की, निविदा सादर करण्यापूर्वी प्रत्यक्ष शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, नागपूर येथे भेट देवून लेखनसामग्रीची पाहणी करावी आणि निविदा सादर करावी. त्यांनतर कोणत्याही प्रकाराची तक्रार विचारात घेतली जाणार नाही व तसेच लेखनसामग्री आणल्यानंतर त्याचे देयक सादर करण्यात यावे तदनंतर देयकाची अदा ही ३ ते ४ महिन्यात अदा करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

तरी दरकरारदारांना याद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी आपल्या मोहरबंद निविदा मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे कार्यालयात ही सूचना प्रसिध्द झाल्यापासून दिनांक ११.०२.२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत सादर कराव्यात.

उशिरा प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही याची संबंधित दरकरारदारांनी नोंद घ्यावी.

मुख्य न्यायदंडाधिकारी,
एस्प्लनेड, मुंबई.